# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

**२०२१**

गुन्हे शाखा, नवी मुंबई

दिनांक ११.०६.२०२१

## जबरी चोरी गुन्हयातील आरोपी चोरीच्या मुद्देमालास कक्ष ३ गुन्हे शाखेकडुन जेरबंद

........................................................................................................................................

नवी मुंबई आयुक्तालयाच्या हद्दीतील जबरी या गुन्हयांचे प्रमाण वाढले होते. सदरचे गुन्हे उघडकिस आणणेकामी श्री बिपीन कुमार सिंह मा. पोलीस आयुक्त सो, डॉ. श्री बी. जी. शेखर पाटील मा. अपर पोलीस आयुक्त सो. (गुन्हे) यांनी सदरचे गुन्हे उघडकीस आणणेकामी दिलेले आदेशाप्रमाणे श्री प्रविणकुमार पाटील मा. पोलीस उप आयुक्त सो., गुन्हे व श्री विनोद चव्हाण मा. सहायक पोलीस आयुक्त सो., गुन्हे यांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष - ३ तपास पथकाने घटनास्थळी भेट देवुन सीसीटीव्ही फुटेज, व पोना/२२२५ किशोर बोरसे यांना गोपनिय बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहिती वरून सदरचा गुन्हा संशयीत आरोपी आसिफ रजा खान याने केला असल्याचे व तो खारघर तळोजा परिसरात असुन मुळ गावी पळुन जाणार असल्याचे माहितीवरून तळोजा फेज २ परिसरातील शिर्के कन्स्ट्रक्शन साईट परिसरात सापळा लावुन गुन्हा दाखल झाले पासुन ३ तासाचे आत सदर इसमाचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेतले आहे.

कक्ष-०३, गुन्हे शाखे कडील तपास पथकाने सखोल कौशल्यपुर्ण तपास करून खालील प्रमाणे नमुद आरोपीस शिताफिने ताब्यात घेवुन त्याचेकडुन गुन्हयात गुन्हयात वापरलेली मोटार सायकल, दोन मोबाईल फोन, रोख रक्कम व इतर मुद्देमाल असा एकुण **८०५२०/- रू किं. चा** मुद्देमाल हस्तगत करून गुन्हा उघडकिस आणला आहे.

| अ. क्र | आरोपीचे नाव पत्ता | गु.रनं व कलम |
|---|---|---|
| १ | आसिफ रझा बाबू रझा खान, वय ३२ वर्षे, सध्या रा. लवेश्वर प्रथम बिल्डींग, रुम नं. बी/४०४, सेक्टर १४, तळोजा फेज - १, नवी मुंबई मुळ रा. चौकनिया, ता. डुमरियागंज, जि. सिद्धार्थनगर, राज्य उत्तर प्रदेश | खारघर पोलीस ठाणे गुन्हा रजि क्र १८८/२०२१ भादवि कलम ३९२ **(मोबाईल जबरी चोरी)**<br>**गुन्हा दा. दिनांक २५/०५/२१ रोजी १९:४५ वा.** |

सदर कामगिरीकरीता कक्ष-०३, गुन्हे शाखेचे वपोनि विजय कादबाने, सपोनि श्रीकांत शेडगे, पोउपनि/शरद भरगुडे यांचेसह पोलीस अमलदार पोलीस हवालदार मनोज चौधरी, रविंद्र कोळी, गौतम कांबळे, विनोद भोईर, पोलीस नाईक किशोर बोरसे, सुधीर चव्हाण, उमेश नेवारे (तांत्रीक तपास), सुधीर पाटील (तांत्रीक तपास), महेंद्र पाटील, यांनी महत्वपुर्ण कामगीरी बजावलेली आहे.

——०००——